Website : www.shivsamarth.co.in संस्थेच्या अधिक माहितीसाठी वेबसाईटवर आजच क्लिक करा.... ♦ वर्ष १६ वे | अंक ९ वा | पाने ४ मुल्य 2 रुपये



॥ श्री कौमारी काळंबादेवी ॥

निर्भीड व नि:पक्ष विचारांचा वारसा जपणारे वृत्तपत्र....

# शिवसमर्थ

॥शिवसमर्थ॥ गोशाळा केंद्र,
स्थळ
वायचळवाडी-माटेकरवाडी, कुंभारगांव, ता. पाटण

♦ मंगळवार दि.०५ मार्च २०२४ ♦ आर.एन.आय.MAHMAR/2007/21759 ♦ संपादक - ॲड.जनार्दन बोत्रे ♦ उपसंपादक - संदीप डाकवे ♦



## श्री क्षेत्र सज्जनगड येथे रामदासनवमी उत्साहात साजरी

सातारा : वृत्तसेवा श्री क्षेत्र सज्जनगड येथे श्री समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड यांच्यातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.रविवार, दि. २५ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२४ या कालावधीत हा उत्सव होणार संपन्न झाला .दासबोध पारायण दि. २५ फेब्रुवारी ते ५ मार्च दररोज सकाळी ८. ०० ते १०.३० पर्यंत चालू होते. दररोज सकाळी १०.३० ते ११.३० प्रवचन,.डॉ. अजित कुलकर्णी, गुरुनाथ महाराज कोटणीस, रवींद्र पाठक, मंदाताई गंधे यांची प्रवचन सेवा तसेच कीर्तन सायं. ४ ते ६ या वेळेत, दि.२५ व २६ रोजी ह. भ. प. निहाल खांबेटे, आंजर्ले, दि. २७ रोजी प्रतीकबुवा रामदासी, सज्जनगड, दि.२८ व २९ फेब्रुवारी समर्थभक्त मकरंदबुवा करंबेळकर, दि. १ मार्च ह. भ. प. विश्वासबुवा कुलकर्णी, दि. २ मार्च चारुदत्तबुवा आफळे, दि.३ व ४ मार्च मकरंदबुवा सुमंत रामदासी यांची कीर्तनसेवा होती.दासनवमी उत्सवात संगीत सेवा दररोज सायं ६.३० वा. होणार असून २५ मार्च रोजी डॉ. मिनल माटेगावकर, मुंबई यांचे गायन.दि. २६ रोजी पंडिता मंगलाताईजोशी, सांगली यांचे शास्त्रीय आणि भक्ती संगीत, दि.२७ रोजी समीर अभ्यंकर, ठाणे यांचे शास्त्रीय, उपशास्त्रीय गायन, दि.२८ फेब्रुवारी रोजी निषाद व्यास यांचे गायन , दि. २९ फेब्रुवारी रोजी योगेश देशमुख आणि सहकलाकार यांचे गायन (समर्थ वाणी) कार्यक्रम पारपडले दि.१ मार्च २०२४ रोजी निनाद दैठणकर, मुंबई (संतूर) आणि अद्वैत काशीकर, मुंबई (बासरी) यांची जुगलबंदी होणार आहे. दि. २ मार्च रोजी अभिषेक काळे (अभंगरंग) यांचे गायन,दि.४ मार्च रोजी पं. सुरेश बापट, ठाणे यांचे गायनाने संपन्न झाला. या दासनवमी महोत्सवात श्री संत सेवा पुरस्कार कार्यक्रम दि. ४ मार्च रोजी सकाळी १०.३० ते ११.३० यावेळेत संपन्न होणार झाला. दि. ५ मार्च२०२४ रोजी दुपारी १२.३०वा. महाप्रसादाला प्रारंभ होणार पार पडला .सर्व कार्यक्रम विनामूल्य होते



रामदास नवमी निमित्त आकर्षक सजावट करण्यात आली होती

यावेळी सातारा जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या कार्यक्रमांचा लाभ घेतला यावेळी समर्थ सेवा मंडळाचे अध्यक्ष समर्थभक्त गुरुनाथ महाराज कोटणीस, कार्याध्यक्ष डॉ. अच्युत गोडबोले व कार्यवाह समर्थभक्त योगेशबुवा रामदासी यांची उपस्थिती होती.



### ॥ श्री संत तुकाराम गाथा ॥

**अभंग ३५ वा**

अंतरींची घेतो गोडी ।
पाहे जोडी भावाची ॥1॥
देव सोयरा देव सोयरा ।
देव सोयरा दीनाचा ॥ध्रु.॥
आपुल्या वैभवें ।
श्रृंगारावें निर्मळ ॥2॥
तुका म्हणे जेवी सवें ।
प्रेम द्यावें प्रीतीचें ॥3॥

### विचारधारा

बाहेरचे जग तसेच आहे जसा विचार करतो. आपले विचारच गोष्टीला सुंदर किंवा कुरुप बनवतात
- स्वामी विवेकांनद

## शिवसमर्थच्या विटा शाखेचा वर्धापन दिन साजरा

### परिसरातील मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव....

**तळमावले/वार्ताहर शिवसमर्थ समुहाचे शिल्पकार ॲड.जनार्दन लक्ष्मण बोत्रे यांच्या कुशल नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या दि शिवसमर्थ मल्टीस्टेट को.ऑप.क्रेडीट सोसायटीच्या विटा शाखेचा वर्धापनदिन मंगळवार दि. २७ मार्च २०२४ रोजी मोठया उत्साहात पार पडला.**

**१५ ऑगस्ट २००६ रोजी तळमावले या ठिकाणी संस्थापक अध्यक्ष ॲड.जनार्दन लक्ष्मण बोत्रे यांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या संस्थेने अवघ्या १७ वर्षाच्या कालावधीत ७५० कोटीं ठेवींच्या उलाढालीची गरुडझेप घेतली आहे. या शाखेच्या वर्धापनदिनानिमित्त मुदत ठेवींवर १ टक्के ज्यादा**

**व्याजदर देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक,सल्लागार ,मुख्यकार्यालयातील अधिकारी तसेच शिवसमर्थ विटा शाखेतील अधिकारी, कर्मचारी, सल्लागार, संचालक यांनी विशेष परिश्रम घेतले व कार्यक्रम सुरळीतपणे पार पडला. वर्धापनदिनी विविध क्षेत्रातील मान्यवर, व्यापारी वर्ग, हितचिंतक यांनी या संस्थांना भेट देवून संस्थेच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या**



विटा शाखेच्या वर्धापन दिनी दिप प्रज्वलन करताना संस्थेचे संचालक, सल्लागार, ठेवीदार, खातेदार, व्यापारी, विटा शाखेतील कर्मचारी व अधिकारी वर्ग

वर्धापन दिना निमित्त मुदत ठेवीवर १% ज्यादा व्याजदर

ठेव स्वीकारण्याचा कालावधी
दि.२७ मार्च २०२४ ते २७ एप्रिल २०२४ ते अखेर

विटा शाखा
सत्यभामा बिल्डींग कराड रोड, ता.खानापुर,जि.सांगली. ४१५३११. मो.९०२८३१४८४४

निर्भीड व नि:पक्ष विचारांचा वारसा जपणारे वृत्तपत्र....
॥ शिवसमर्थ ॥


शिवसमर्थ
चांद्रयान ठेव योजना
३६ महिने मुदतीकरता
सर्वाधिक १२% व्याजदर
9697069191 / 9145024989

शिवसमर्थ

# संपादकीय



## महाशिवरात्री निमित्त हार्दीक शुभेच्छा

महाशिवरात्रीचे महत्व वेगळेच आहे.प्रत्येक चंद्र महिन्यातील 14 वा दिवस किंवा प्रतिपदेच्या आधीचा दिवस शिवरात्री म्हणून ओळखला जातो. वर्षभर येणार्या बारा शिवरात्रींमध्ये फेब्रुवारी-मार्च मध्ये येणार्या महाशिवरात्रीला सर्वात अधिक आध्यात्मिक महत्व आहे. या रात्री पृथ्वीच्या उत्तर गोलार्धाची स्थिती अशी असते की मनुष्यात नैसर्गिक ऊर्जेचा उद्रेक होतो. या दिवशी निसर्ग एखाद्या व्यक्तीला त्याच्या आध्यात्मिक शिखरावर ढकलत असतो. याचा वापर करून घेण्यासाठी, या संस्कृतीमध्ये आपण रात्रभर सुरू असणारा उत्सव साजरा करायला सुरुवात केली. नैसर्गिक ऊर्जेच्या या उद्रेकाला योग्य दिशा देण्यासाठी, रात्रभर सुरू असणार्या या उत्सवातील प्राथमिक आवश्यकता म्हणजे आपण आपल्या पाठीचा कणा ताठ ठेवून संपूर्ण रात्र न झोपता, जागे राहणे.अध्यात्माच्या मार्गावर असणार्या व्यक्तींसाठी महाशिवरात्र अतिशय महत्वाची आहे. कौटुंबिक व्यक्ती, तसेच जगातील महत्वाकांक्षी लोकांसाठीसुद्धा ही अतिशय महत्वाची आहे. कुटुंबात रममाण होणार्या व्यक्ती हा दिवस शंकराच्या लग्नाचा वाढदिवस म्हणून साजरा करतात. जी लोकं अतिशय महत्वाकांक्षी आहेत ते हा दिवस शिवाने त्याच्या सर्व शत्रुंवर मात केली म्हणून साजरा करतात.परंतु योगी व्यक्तींसाठी, हा दिवस म्हणजे शिव कैलास पर्वताशी एकरूप झाले तो दिवस आहे. ते पर्वतासारखेच बनले अतिशय स्थिर. योग परंपरेत, शिव देव म्हणून पूजले जात नाही तर त्यांना आदिगुरु, म्हणजे ज्यांच्यापासून योग विज्ञान उगम पावले ते प्रथम गुरु असे मानले जाते. हजारो वर्षे ध्यान केल्यानंतर एके दिवशी ते अत्यंत स्थिर बनले. तो महाशिवरात्रीचा दिवस आहे. त्यांच्यामधील सर्व हालचाल बंद झाली व ते संपूर्णतः स्थिर झाले त्यामुळे योगी महाशिवरात्रीकडे स्थैर्याची रात्र या दृष्टीने पाहतात.समजुती बाजूला ठेवून दिल्या तरीसुद्धा, योग परंपरेत हा दिवस आणि रात्र महत्वाची मानली जातो याचे कारण हा दिवस अध्यात्माची ओढ असणार्या व्यक्तींना प्रचंड संधी उपलब्ध करून देतो. आधुनिक विज्ञान अनेक टप्प्यांमधून पुढे गेलेले आहे आणि आज या निष्कर्षापर्यन्त पोहोचलेले आहे की ज्याला तुम्ही जीवन असे म्हणता, तुमच्या अस्तित्वाबद्दल माहिती असणारी प्रत्येक गोष्ट, तुम्हाला विश्व आणि आकाशगंगा म्हणून माहिती असणारी गोष्ट, या सर्व गोष्टी एकच आहेत आणि त्या लक्षावधी मार्गांनी प्रकाशित होतात हे आज सिद्ध झालेले आहे.अथांगतेची माहिती करून घेण्यासाठी उत्सुक असणे, अस्तित्वातील एकत्व जाणून घेण्याची उत्सुकता म्हणजे योग. याचा अनुभव घेण्याची संधी महाशिवरात्रीची रात्र तुम्हाला उपलब्ध करून देते.

# करंबळ कर्नाटक येथे ग्रामदैवत श्री लक्ष्मीदेवी यात्रेचा मोठया उत्साहात प्रारंभ



मौजे करंबळ कर्नाटक येथे ग्रामदैवत श्री लक्ष्मीदेवीच्या यात्रेचा प्रारंभ मोठया उत्साहात झाला सदर यात्रा सदर यात्रा बुधवार दि.२८ फेब्रुवारी ते गुरूवार दि. ७ मार्च अखेर पार पडणार असून यात्रा १९ वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर संपन्न होत असल्याने भाविकांमध्ये उत्साहाचे व चैतन्याचे वातावरण दिसून आले. सदर यात्रा काळात बुधवार दि.२८ फेब्रुवारी रोजी सकाळी श्री लक्ष्मीदेवीचे अक्षदारोपन करून व त्यानंतर करंबळ, जळगे, रुमेवाडी, होनकल, कौंदल, येथील मानकऱ्यांच्या ओट्या स्वीकारून सायंकाळी ठीक ६.०० वाजता श्री लक्ष्मीदेवी गदगेवर विराजमान झाली. शुक्रवार दि. ०१ मार्च २०२४। रोजी गावकऱ्यांचा ओटी भरणेचा कार्यक्रम,मंगळवार दि. ५ मार्च २०२४ रोजी आंबलीचे गाडे फिरवण्याचा कार्यक्रम,गुरुवार दि. ०७ मार्च २०२४ रोजी श्री लक्ष्मीदेवीचे सायंकाळी ४.०० वा. सिमेकडे प्रयाण होऊन या यात्रा उस्तवाची सांगता करण्यात आली. या ९ दिवसामध्ये प्रत्येक गावात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

शिवसमर्थ संस्थेच्या वतीने माहिती देण्यासाठी स्टॉल लावला होता. शिवसमर्थ समुहाचे शिल्पकार ॲड.जनार्दन बोत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या स्टॉलचे नेटके नियोजन करण्यात आले होते. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सदर स्टॉलला भेट देवून संस्थेच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले संस्थेच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. करंबळ व परिसरातील सर्व शाखातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी या ठिकाणी उपस्थित राहून संस्थेची माहिती आलेल्या ग्राहकांना व उपस्थितांना दिली.







करंबळ कर्नाटक श्री लक्ष्मीदेवी यात्रेनिमित्त ग्राहकांना संस्थेच्या पत्रकाची माहिती देताना शिवसमर्थ परिवाराचे अधिकारी व कर्मचारी वर्ग

**शिवसमर्थ पेट्रोलियम**
कराड-चिपळूण रोड, मनेरी धक्क्या जवळ, कराटे ता.पाटण, जि.सातारा मो.9009398002





# • प्रेरणेमागील कष्ट •

पालकांनी आपल्या मुलांचे छंद व आवडी लक्षात घेऊन, चाकोरीबाहेर जाऊन त्यांना हव्या त्या क्षेत्रात प्रगती करू दिली तर काय होतं, याचे उत्तम उदाहरण अनेकांसाठी प्रेरणादायी असतं.बुद्धिबळ हा अस्सल भारतीय खेळ. यामध्ये चेन्नईच्या केवळ १६ वर्षीय बुद्धिबळपटू प्रज्ञानंदने तब्बल ५ वेळा जगज्जेतेपद पटकावणाऱ्या मॅग्नस कार्लसनचा ऑनलाइन एअरथिंगमास्टर्स स्पर्धेत काळ्या प्याद्यांसह खेळून पराभव करण्याचा चमत्कार केला आणि अवघ्या बुद्धिबळ क्षेत्राचे डोळे विस्फारले. आता सध्या प्रज्ञानंदची बहीण व भारताची आर. वैशाली हिने ग्रँड स्विस बुद्धिबळ स्पर्धेच्या नवव्या फेरीत माजी विश्वविजेत्या बुल्गेरियाच्या अँटोनेटास्टेपनोव्हा हिचा पराभव करण्यात यश मिळविले. कारकिर्दीतील सर्वात मोठी स्पर्धा खेळणाऱ्या वैशालीने या प्रक्रियेत तिची चौथी ग्रँडमास्टरनॉर्म ही पूर्ण केली. मुलांनी शांत बसावे म्हणून पालक मुलांना टी. व्ही बघायला सांगतात किंवा त्यांच्या हातात मोबाइल देतात. या दोन्हीसवयीं पासून दूर राहावे म्हणून बुद्धिबळाच्या प्रशिक्षण वर्गात या दोन्ही मुलांचे आईवडिलांनी नाव नोंदविले. त्यामुळेच भारताला आर. प्रज्ञानंदव त्याची बहीण वैशाली यांसारखे बुद्धिबळातील दोन अव्वल हिरे लाभले आहेत. प्रेरणेमागील कष्ट असलेल्या तामीळनाडू मधील प्रज्ञानंद व वैशाली या दोन्ही भावंडांना सतत टी. व्ही, मोबाइल बघत बसणे यांसारख्या वाईट सवय लागू नयेत म्हणून त्यांच्या पालकांनी त्यांना बुद्धिबळ शिकवण्याचा प्रेरणेच्या पायवाटा डॉ. अनिल कुलकर्णी प्रज्ञानंदाने त्याच्या न कळत्या वयापासूनच बुद्धिबळाची कास धरली. त्याची बहीण वैशाली हिच्याकडून त्याला बुद्धिबळाचे प्राथमिक धडे मिळाले. वैशाली बुद्धिबळाकडे कशी वळली याचा किस्साही रंजक आणि सुजाण पालकांसाठी उद्बोधकही आहे. वैशालीला लहानपणी टीव्हीवर कार्टून फिल्म्स बघत बसण्याची आवड होती. ती तासन्तास टीव्हीसमोरच बसून असायची. त्यामुळे तिचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी तिची आई आणि वडिलांनी तिला बुद्धिबळाच्या प्रशिक्षण वर्गात पाठवले. तिला हा खेळ भावला आणि ही आवड तिच्यामुळे तिच्या भावातही रुजली. त्यांच्या आई—बाबांचा हा निर्णय अत्यंत अचूक ठरला. वैशालीही आज ग्रँड मास्टर आहे आणि प्रज्ञानंदाचा पराक्रम तरआपल्या नजरेसमोरच आहे. बुद्धिबळात तरबेज असलेल्या तामीळनाडूमधील प्रज्ञानंद व वैशाली या दोन्ही भावंडांना सतत टी. व्ही, मोबाइल बघत बसणे यांसारख्या वाईट सवय लागू नयेत म्हणून त्यांच्या पालकांनी त्यांना बुद्धिबळ शिकवण्याचा निर्णय घेतला.आई—वडिलांनी या दोन्ही भावंडांना बी. रमेश यांसारख्या अनुभवी बुद्धिबळ प्रशिक्षकाकडे शिकण्यास पाठवले. त्यामुळे या भावंडांमध्ये बुद्धिबळाची आवड निर्माण झाली नसती तर ते मोठे नवलच होते. अर्थात त्यांच्या आईवडिलांना याचे श्रेय द्यावे लागेल. सुरुवातीच्या काळात वैशालीचा धाकटा भाऊ म्हणूनच प्रज्ञानंदची ओळख होती. मात्र आता या दोन्ही भावंडांनी केवळ भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावर आपला स्वतंत्र ठसा उमटविला आहे. प्रज्ञानंदाने बुद्धिबळाच्या क्षेत्रात स्वत:च स्वत:चा मार्ग तयार केला आणि सन २०१८ मध्ये त्याने वयाच्या केवळ १० व्या वर्षी प्रतिष्ठित ग्रँडमास्टर पदवी मिळवली. तो देशातील सर्वात लहान वयातला आणि जगातील आतापर्यंतचा दुसरा सर्वात तरुण ग्रँड मास्टर ठरला प्रत्येक यशामागे एक पायवाट असते हेच खरं. ■■■■■■



# गव्याच्या हल्ल्यात गाय ठार

ढेबेवाडी, ता. २९ : जनावरांच्या कळपात घुसलेल्या गव्याने केलेल्या हल्ल्यात गाभण गाय ठार झाल्याची थरारक घटना विभागातील महिंद धरणाच्या परिसरातील बोर्गेवाडी जवळ (सळवे, ता. पाटण) दहाच्या सुमारास घडली. या घटनेने सळवे, महिंद परिसरात घबराटीचे याबाबतची माहिती अशी, महिंद धरणाच्या परिसरात रानडुकरे, गवे, वानरे आदी वन्यप्राण्यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. पिकांच्या संरक्षणासाठी शेतकरी नवनवीन उपाय शोधत असले, तरी वन्यप्राणी त्यास जुमानत नसल्याचे चित्र आहे. सकाळी दहाच्या सुमारास बोर्गेवाडी येथील शेतकरी सत्यवान ज्ञानदेव कदम नेहमी प्रमाणे गावाजवळच्या शिवारात जनावरे चरण्यासाठी घेऊन गेले होते. त्यावेळी अचानक जनावरांच्या कळपात गवा शिरला आणि त्यांने गाईवर हल्ला केला शिवारात जनावरे चरण्यास नेणाऱ्या शेतकऱ्यांची काळजी वाढली आहे. ■■■■

## शिवसमर्थ वधू-वर सुचक केंद्र

**ऋणानुबंध**

शिवसमर्थ ऋणानुबंध मध्ये जाहीरात, मंगलकार्य घरात

**वधू पाहिजे**

**नाव :** चि. तुषार बंडू चव्हाण
**पत्ता :** मु.पो. कोळे, ता. कराड, जि.सातारा
**संपर्क :** ९०४९२५२४११ /८८८१९६५२९
**शिक्षण :** बी.कॉम.
**नोकरी :** ग्रामपंचायत कोळे (क्लार्क)
**जन्म ता.** ३०/१२/१९९५
**जन्मवेळ :** रात्री ११.३० मि.
**उंची :** ५ फुट २ इंच
**जात :** हिंदू-मराठा *शेती : २.५ एकर बागायत
**नावरस नाव :** तानाजी
**वडीलांचे नाव :** श्री. बंडू बाळू चव्हाण (शेती), कोळे ता.कराड **बहीण :** २ विवाहीत
**अपेक्षा :** सुसंस्कृत

**वधू पाहिजे**

**नाव:** चि. प्रशांत प्रदीप अडसर
**पत्ता:** मु.पो. वाखरी, ता. पंढरपूर जि. सोलापूर
**संपर्क.** ७०३०२७०२८२/९६६५९८१३५६
**शिक्षण:** बी.कॉम (पदवीधर)
**नोकरी-** दि शिवसमर्थ मल्टी.को.ऑप क्रे.सोसायटी (शाखा व्यवस्थापक)
**जन्म ता.:** ०९/०९/१९९५ **वेळ:** दु.१२.१५
**उंची:** ५ फुट ३ इंच, **रंग:** गोरा
**जात:** हिंदू लिंगायत वाणी (पंचम)
**रास:** सिंह, **नक्षत्र:** मघा, **गण:** राक्षस,
**वर्ण:** क्षत्रीय, **नाडी:** अंत, **चरण:** २ **रक्त गट:** AB+
**वडीलांचे नाव:** श्री. प्रदीप महारूद्र अडसर
**आईचे नाव:** सौ. शैलजा प्रदीप अडसर
**अपेक्षा:** सुंदर व सुसंस्कृत हवी

**संपर्क : शिवसमर्थ भवन, कराड-ढेबेवाडी रोड, तळमावले, ता.पाटण, जि.सातारा.मो.९००९४१७००१**



# देगावच्या कन्येला 18 लाखांची शिष्यवृत्ती

## अमेरिकेतून घेणार पुढील शिक्षण

सोलापूर : म्हारी छोरियां छोरोंसे कम हैं के? हा दंगल चित्रपटातील आमीर खानचा डायलॉग प्रत्यक्षात खरा करून दाखविला आहे देगावच्या एका कन्येने व — तिच्या पित्याने ! सर्व सामान्य मुलीच्या पित्याने आपल्या मुलीला असे शिक्षण दिले की हम भी किसीसे कम नहीं है असे सिद्ध करत व वडिलांचा विश्वास सार्थ ठरवत मुलीने अमेरिकेतील एका विद्यापीठाची उच्च शिक्षणासाठी तब्बल १८ लाखांची शिष्यवृत्ती मिळविली आहे. मूळची देगाव, तालुका उत्तर सोलापूर येथील मात्र सध्या मुंबई येथे राहत व शिक्षण घेत असलेल्या अनसूया नवनाथ वाघमारे हिने आपल्या जिद्द व चिकाटीच्या जोरावर ही उंच भरारी घेतली आहे.

अनसूया वाघमारे हिचे पहिली ते बारावीपर्यंतचे शिक्षण सीबीएसई बोर्डाच्या माध्यमातून अँटोमिक एनर्जी सेंट्रल स्कूल, अणुशक्तीनगर मुंबई येथून झाले. तिने दहावीला ८७ टक्के, तर बारावीला ९२ टक्के गुण मिळविले असून, आता तिला बॅचलर इन कॉम्प्युटर सायन्स या पुढील पदवीच्या शिक्षणासाठी युनिव्हर्सिटी ऑफआयडाहो या अमेरिकेतील विद्यापीठाची १५ ते १८ लाखांची शिष्यवृत्ती मिळाली आहे. ही शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी आयडीबी या संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या ऑफ लाइन पात्रता परीक्षेत अनसूया हिने आयइएलटीएस परीक्षेमध्ये नऊपैकी सात बँड मिळविले, तर एस.ए.टी. परीक्षेत १६०० पैकी ११०० गुण मिळविले आहेत. तसेच ४५ मिनिटे चाललेल्या ऑनलाइन मुलाखतीत अपेक्षित उत्तरे दिली, यामुळे ती शिष्यवृत्ती मिळविण्यास पात्र ठरली आहे.आता ती चार वर्षे अमेरिकेतच स्थायिक होऊन आपले शिक्षण पूर्ण करणार आहे. आपल्या पुढील शिक्षणासाठी ती जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यत अमेरिकेला रवाना होणार आहे. त्याचबरोबर शिक्षण पूर्ण केल्यानंतर परत हिंदुस्थानात आल्यावर सॉफ्टवेअर डेव्हलपर बनून देशसेवा करणार असल्याचे तिने सांगितले. तसेच आपल्या या यशात शिक्षकांसह आई नीता, आजोबा दत्तात्रय, आजी पद्मिनी वाघमारे तसेच आजी तेजा घंटे व कल्पना घंटे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे तिने सांगितले.

वाहनचालक वडिलांनी दिले प्रोत्साहन अनसूया हिचे वडील नवनाथ दत्तात्रय वाघमारे हे भाभा अणुसंशोधन केंद्र मुंबई येथे ग्रेड एक वाहनचालक पदावर कार्यरत आहेत. त्यांनीच तिला उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन व पाठिंबा दिला आहे. आपल्या कन्येच्या या भरारीविषयी ते म्हणाले की, आपण स्वत: जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत शिकलो आहोत. मात्र, आपल्याला क्षण किती महत्त्वाचे आहे, याची जाणीव असल्याने आपण मुलीच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. मुलीनेही त्याचे चीज केले, याचा आपल्याला अभिमान आहे

शिवसमर्थ हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक ॲड.जनार्दन बोत्रे यांनी शिवसमर्थ पब्लिकेशन प्रा.लि; तळमावले घर नं.२११ मातोश्री कृपा, तळमावले हायस्कुलच्या पाठीमागे, ता.पाटण, जि.सातारा पिन.४१५१०३ येथे छापून तळमावले येथून प्रकाशित केले. अंकातील मजकुराशी सपांदक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद पाटण न्यायकक्षेत

निर्भीड व नि:पक्ष विचारांचा
वारसा जपणारे वृत्तपत्र....
॥ शिवसमर्थ ॥

शिवसमर्थ
पेट्रोकेम
गट नं. ८०९, इंडियन ऑईल पेट्रोल पंप, ए.एच.४७,
सुपर हायवे सर्व्हीस रोड सुरूर, सातारा, महाराष्ट्र ४१५५१७

# मानेगाव मध्ये आई इंजाई देवीचा भंडारा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा

तळमावले : दरवर्षी प्रमाणे मानेगाव ता. पाटण येथे गावाची ग्रामदैवत असणारी आई इंजाई देवीचा भंडारा उत्सव मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला.मंदिराच्या परिसरात सुंदर रांगोळी आणी आकर्षक विद्युत रोशनाई करण्यात आली होती. आईच्या नावाच्या जय जयकाराणे इंजाईचा डोंगर गजबजला,नवसाला पावणारी इंजाई आईच्या भंडारा उत्सवा निमित्त मानेगाव पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या भक्तीभावाने आईच्या दर्शना साठी आले होते श्री इंजाई देवी विकास मंडळाच्या सुयोग्य नियोजनानुसार दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ रोजी देवी आईचा अभिषेक, ईंजाईदेवी पालखी मिरवणूक सोहळा, हळदीकुंकू समारंभ, आईचा गोंधळ, इंजाई देवी आणि हनुमान नैवेद्य (बडाम) आणी रात्री भजनी मंडळ मानेगांव यांचा भजनचा कार्यक्रम आयोजित केला होता.तसेच दिनांक २९ फेब्रुवारी २०२४ ला सकाळी श्री. हनुमान अभिषेक, आईच्या सुहासिनी (आई इंजाईदेवी मंदिर मध्ये) आणी सायंकाळी आईच्या महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. देवीचा भंडारा उत्सव



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भक्तिमय आणी आनंदाच्या वातावरणात साजरा करण्यात आला.

# कृषी पुरस्कारासाठी सातारा जिल्ह्यातील 12 शेतकऱ्यांची निवड

सातारा : राज्य शासनाच्या कृषीविभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या विविध कृषीविषयक पुरस्कारांची घोषणा झाली असून, त्यात जिल्ह्यातील १२ शेतकऱ्यांसह व एका कृषी सहायकाचा समावेश आहे. यामध्ये वसंतराव नाईक शेतिनिष्ठ पुरस्कारने २०२० (कोल्हापूर विभाग सर्वसाधारण गट) —. नितीन बाजीराव वरखडे (रा. वरखडवाडी, —, ता. वाई), वसंतराव नाईक शेतिनिष्ठ पुरस्कार २०२१ (कोल्हापूर विभाग सर्वसाधारण गट) अधिक मारुती माने (मानेगाव, ता. पाटण), वसंतराव नाईक शेतिनिष्ठ पुरस्कार २०२२ (कोल्हापूर विभाग सर्वसाधारण गट) प्रशांत भिकू शिंगटे (रा. खडकी, ता. वाई), वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार २०२१ (कोल्हापूर विभाग विभागून) सचिन साधू सांगळे (रा. कुरवली बुद्रुक, ता. फलटण), उद्यान पंडित पुरस्कार २०२१ (कोल्हापूर विभाग विभागून) रामदास भुजंगराव कदम (रा. गिरवी, ता. फलटण), युवा शेतकरी पुरस्कार २०२१ (कोल्हापूर विभाग) सौरभ विनयकुमार कोकीळ, (उद्यानपंडित पुरस्कार २०२२ (कोल्हापूर विभाग) जालिंदर जगन्नाथ दडस (टाकेवाडी, ता. माण), कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार २०२१ (कोल्हापूर विभाग) अरुण चंद्रकांत कचरे (रा. वाघेरी, ता. क—हाड), कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार २०२२ (कोल्हापूर विभाग) उद्धवराव ज्ञानेश्वर बाबर (रा. देवापूर, ता. माण), वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार २०२२ (कोल्हापूर विभाग विभागून) संदीप राजाराम डाकवे (रा. डाकेवाडी, ता. पाटण), युवा शेतकरी पुरस्कार २०२२ (कोल्हापूर विभाग विभागून) नीलेश हणमंत पवार (रा. असवली, ता. खंडाळा), जिजामाता कृषिभूषण पुरस्कार (कोल्हापूर विभाग) रूपाली सत्यवान जाधव (रा. कर्णवडी, ता. खंडाळा) यांना, तर पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे—पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार (कोल्हापूर विभाग) कृषी सहायक सचिन सोमा जाधव (रा. सासकल, ता. फलटण) यांना जाहीर झाला. यातील अनेक विजेत्या शेतकऱ्यांची यशकथा दैनिक ॲग्रोवनमध्ये प्रसिद्ध झाली आहे.

दि शिवसमर्थ मल्टी.को ऑप. क्रे.सोसायटी
लि.तळमावलेच्या शाखांना
वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

| | | |
|---|---|---|
| शाखा मलकापूर | वर्धापन दिना निमित्त १.०० % ज्यादा व्याजदर<br>कालावधी : ४ मार्च २०२४ ते ४ एप्रिल २०२४ | मलकापूर-कराड शाखा :३५६/१३,'गुरुकृपा अपार्टमेंट', मलकापूर नगरपंचायत, ढेबेवाडी फाटा, ता. कराड, जि. सातारा. मो. ७०५८०६०८६७ |
| शाखा विंग | वर्धापन दिना निमित्त १.०० % ज्यादा व्याजदर<br>कालावधी : ७ मार्च २०२४ ते ७ एप्रिल २०२४ | त्रिमुर्ती कॉम्प्लेक्स, कराड-ढेबेवाडी रोड, आदर्श विद्यामंदीर समोर, विंग हॉटेल विंग ता. कराड, जि. सातारा पिन.४१५१२२, मो. ९००९७१९००२ |
| शाखा विरार | वर्धापन दिना निमित्त १.०० % ज्यादा व्याजदर<br>कालावधी : ८ मार्च २०२४ ते ८ एप्रिल २०२४ | विरार शाखा : शॉप नं. ६, एकविरा देवी कृपा बिल्डींग, चर्च जवळ, मनवेलपाडा, रोड विरार (पूर्व) ४०१३०५. मो : ८५३०५५७४४७ |
| शाखा खानापूर | वर्धापन दिना निमित्त १.०० % ज्यादा व्याजदर<br>कालावधी : ९ मार्च २०२४ ते ९ एप्रिल २०२४ | खानापूर (जि. बेळगांव) शाखा : ज्योतिर्लिंग कृपा, गाळा नं. १, बिल्डींग नं. १५९९, बेळगांव-गोवा रोड, ता. खानापुर,जि.बेळगांव. राज्य-कर्नाटक. ५९१३०२. फोन मो. ८३३६२२३८४४, ९०३६४४७०४८ |

# कर्णकर्कश हॉर्नने बसताहेत कानठळ्या..! ग्रामीण भागातील नागरिक हैराण : टवाळखोरांवर पोलिसांचा वचक हवाच

सणबूर : कर्णकर्कश आवाज करीतधूम स्टाईलने दुचाकी चालवण्याची क्रेझ सध्या युवकांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. नागरिकांना अशा आवाजाचा त्रास होत असल्यामुळे अशा सायलेन्सर लावणाऱ्या दुचाकींवर कारवाई करून बंदी घालण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

पाटण तालुक्याच्या ग्रामीण भागात अशा दुचाकी गाड्यांचा सर्रास वापर होताना दिसत आहे. यामध्ये तळमावले व ढेबेवाडी या बाजारपेठेत अशी वाहने मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत आहेत.

बेफिकीर धूमस्टाईल फिरणाऱ्या वाहनांवर तसेच सायलेन्सर बसवून देणाऱ्या गॅरेजवर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# कूपनलिकेद्वारे दिला सणबूरच्या शाळेला दिलासा

## 1994-95 च्या बॅचचे दातृत्व;

ढेबेवाडी, ता. २९: ज्या शाळेत आपण शिकलो, घडलो, त्या शाळेविषयी कृतज्ञता व्यक्त करून तेथील पाणीपुरवठ्याची गैरसोय दूर करण्यासाठी सणबूर (ता. पाटण) येथील महात्मा गांधी विद्यालयातील दहावीच्या १९९४—९५ व्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी स्वखर्चाने कूपनलिका काढली. पाणीपुरवठ्याची स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित केली आहे. नुकतेच या सुविधेचे उद्‌घाटन झाले. माजी विद्यार्थ्यांच्या दातृत्वामुळे विद्यालयासमोरील गैरसोय दूर झाली आहे. विद्यार्थी, शिक्षक, पालक व ग्रामस्थांनी १९९४—९५ मधील दहावीच्या बॅचला धन्यवाद दिले.

सणबूर येथील रयत शिक्षण संस्थेचे महात्मा गांधी विद्यालयातील १९९४—९५ च्या दहावीच्या बॅचच्या विद्यार्थ्यांनी विद्यालयासमोरील पाणीटंचाईची समस्या दूर करण्यासाठी त्यांच्या व्हॉटअप ग्रुपवर केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत उस्फूर्तपणे मदत जमा केली. या बॅचचे ८० हून अधिक विद्यार्थी आहेत. गावच्या नळयोजनेद्वारे मिळालेल्या एका नळावर विद्यालयाची पाण्याची गरज मागत नसल्याने कूपनलिका खोदण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार जमा झालेल्या रकमेतीत एक लाख १५ हजार रुपये खर्चुन कूपनलिका खोदण्यात आली. पाणीही चांगले लागते. पंप व अन्य जोडणी करून कार्यान्वित केलेल्या या यंत्रणेचे उद्‌घाटन नुकतेच करण्यात आले. येथून गावच्या स्मशानभूमीतही पाण्याचा एक नळ देऊन तेथील गैरसोयही दूर करण्यात आली. यावेळी सरपंच व माजी विद्यार्थी विशाल जाधव, पोलिस पाटील राजेश सुतार, माजी उपसभापती रघुनाथ जाधव, सोसायटीचे अध्यक्ष एस. टी. जाधव, शिक्षण समितीचे अध्यक्ष ज्ञानदेव जाधव, प्रकाश कुंभार, श्री. देसाई, पी. डी. जाधव आदींसह पदाधिकारी, ग्रामस्थ, विद्यार्थी—विद्यार्थिनी, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.



॥ शिवसमर्थ ॥
बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स
मु.पो.तळमावले ता.पाटण, जि.सातारा. महाराष्ट्र ४१५१०३
संपर्क : 8805000393

आमच्याकडे रस्ते व
इमारतीचे बांधकाम करुन मिळेल.

निर्भीड व नि:पक्ष विचारांचा
वारसा जपणारे वृत्तपत्र....
॥ शिवसमर्थ ॥


शिवसमर्थ
चांद्रयान ठेव योजना
३६ महिने मुदतीकरता
सर्वाधिक ११% व्याजदर
9697069191 / 9145024989

# गावठाणांना त्वरित स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा द्यावा

ढेबेवाडी: प्रकल्पग्रस्तांची मूळगाव ठाणातल्या मतदार यादीतील नावे कमी करून त्यांचे ज्या गावच्या कार्यक्षेत्रात पुनर्वसन झाले आहे तेथील ग्रामपंचायतीच्या मतदार यादीत समाविष्ट केली गेली आहेत. मात्र त्यानंतरही संबंधित ग्रामपंचायतीला पुनर्वसित गावठाणात सुविधा पुरविण्यासाठी जर कोणत्याही प्रकारचा निधीच मिळणार नसेल तर ही उठाठेव काय कामाची? असा संतप्त सवाल धरणग्रस्तांकडून उपस्थित केला जात आहे. त्याचवेळी स्थानिकांकडून दुजाभाव होत असल्याने पुनर्वसित गावठाणांना तातडीने स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देऊन स्वतंत्रपणे निधी द्यावा, अशी मागणी वांग– मराठवाडी पुनर्वसित गावठाणातील प्रकल्पग्रस्तांनी केली आहे.राज्य पुनर्वसन प्राधिकरणाचे सांगली जिल्हा प्रतिनिधी व जनजागर प्रतिष्ठानचे जिल्हा समन्वयक जगन्नाथ विभुते यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या सातारा जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांच्या मतदार यादीतील दुबार नोंदी वगळण्यासाठी प्रकल्पग्रस्तांच्या गावठाणात जाऊन विशेष मोहिमेद्वारे नावे वगळण्याचे काम चालू आहे. पण ज्या प्रकल्पग्रस्तांचे नव्या गावठाणात स्थलांतर होऊन सुमारे २५ वर्षे झाली तरी त्या गावठाणाला स्वतंत्र ग्रामपंचायतींचा दर्जा मिळालेला नाही. धरणग्रस्तांचे वास्तव्य असणाऱ्या गावठाणात सुविधांसाठी निधीही मिळत नाही. ज्या ग्रामपंचायत हद्दीत धरणग्रस्तांचे पुनर्वसन झाले आहे, त्या ग्रामपंचायतीकडून पुनर्वसित गावठाणात सुविधांसाठी निधी खर्च केला जात नाही. असे असूनही शासन दुर्लक्ष करीत आहे. ■■■■■

**मूळ बाधित गावावरही अन्याय..**१४ मे २०१० च्या शासन परिपत्रकानुसार मूळ बाधित गावातील ग्रामपंचायतीला वित्त आयोगासह मिळणारा शासनाचा निधी बंद केला. पण त्याच मूळ बाधित गावात आज नव्याने पुनर्वसन गावठाणे वसवण्यात आली आहेत. तसेच निधीसाठी वारंवार पाठपुरावा करून सुद्धा या मूळ बाधित गावातील ग्रामपंचायतीला शासनाने निधी दिलेला नाही. तसेच नव्या गावठाणाला निधी दिला नाहीच, याशिवाय स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा दिला नाही.

# पाटण तालुक्यात वणव्यामुळे डोंगररांगाही काळवंडल्या...

## *चाऱ्याचेही नुकसान : जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न बिकट*


पाटण तालुक्यात डोंगराला लावलेल्या वणव्यामुळे गवत जळून खाक झाल्याने चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

वणव्यांमुळे औषधी वनस्पती, दुर्मीळ कीटक जनावरांच्या चाऱ्याचेही मोठे नुकसान होत आहे. सध्या सर्वत्र वनव्यांची धग पसरत आहे. त्यामुळे डोंगररांगा काळवंडलेल्या दिसत आहेत.पाटण तालुका सह्याद्रीच्या डोंगर रांगा व कड्यकपारीत विखुरलेला आहे. वनक्षेत्र व खासगी क्षेत्रावर मोठ्य प्रमाणावर वनसंपदा आहे. त्याचबरोबर हिरडा, बेहेडा, अडुळसा, रक्तचंदन, हाडसांद्री, निर्गुडी, आवळा यासारख्या अनेक औषधी वनस्पती आहेत, शिवाय विविध जातींचे पक्षी, सर्व कीटक, सरडे, भुंगे, ससे अशा प्राण्यांचे वास्तव्य आहे.जानेवारी ते मे यादरम्यान तालुक्यात डोंगरांना मोठ्या प्रमाणात वनवे लागतात. त्यामुळे वणव्याच्या भक्ष्यस्थानी सापडून वनसंपदा पूर्णपणे नष्ट होत असते. जनावरांच्या चाऱ्याचाही गंभीर प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे वणवे वाचवण्यासाठी सामुदायिक प्रयत्न होण्याची गरज आहे. वणवे लागू नयेत यासाठी सामाजिक व सेवाभावी संस्थांनी पुढे येण्याची गरज आहे. ग्रामीण भागात दुष्परिणाम, वणव्यामुळे होणारे नुकसान याबाबत माहिती देण्याची गरज आहे.गावोगावी असणाऱ्या वनसमित्यांनी पुढाकार घेतला पाहिजे.

वनसंपदा वाचवण्यासाठी ग्रामसभेतही त्याबाबतची माहिती दिली पाहिजे.तसे झाल्यास डोंगररांगा हिरव्यागार दिसतील. कीटक, पक्षी, प्राण्यांचे वास्तव्य वाढेल आणि निसर्गाचा ह्रास थांबण्यास मदत होणार आहे. वनखात्यानेही गावोगावी वणवे रोखण्यासाठी नागरिकांना आव्हान करण्याची गरज आहे.

सुवार्तातिच्या काळामध्ये वनविभाग डोंगरकपारीमध्ये वनविभागाच्या हद्दीवरती पट्टे ओढत असल्यामुळे वनवा पसरण्याचे प्रमाण कमी प्रमाणात आढळून येत होते.परंतू वनविभाग सध्याच्या काळात सदर काम करत नसल्याने वनवे मोठया प्रमाणात पसरताना दिसून येत आहे त्यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान होत आहे ■■■■

# गाडगे महाराज महाविद्यालयातील 13 विद्यार्थी अग्निवीरसाठी निवड

कराड : येथील सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयातील १३ विद्यार्थ्यांची सैन्य दलातील अग्निवीर म्हणून निवड झाली आहे. त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. यातील १९ महाराष्ट्र बटालियन एनसीसी कराड मधील विश्वजित प्रकाश पवार (अग्निवीर नेव्ही), आदित्य कृष्णात माळी, रोहित सतीश जाधव, आकाश सुरेश जाखले (अग्निवीर आर्मी) साठी निवड झाली आहे. महाविद्यालयातील अन्य विभागांतील विद्यार्थी अभय राजकुमार बागल, आदित्य अजित कोष्टी, मयुरेश अधिकराव घाडगे, सूरज श्यामराव पडळकर, ओंकार विकास रंधवे, प्रसाद सुनील नलवडे, प्रथमेश गणपती पवार(अग्निवीर आर्मी), अभिजित चंद्रकात कणसे (अग्निवीर तांत्रिक) म्हणून निवड झालेली आहे.या सर्व अग्निवीरांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाविद्यालयातील १३ विद्यार्थ्यांची निवड अग्निवीर म्हणून होणे ही महाविद्यालयासाठी अभिमानाची गोष्ट असल्याचे मत यावेळी प्राचार्य राजमाने यांनी यावेळी व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य एस. ए. पाटील, डॉ. यू. बी. मोरे, प्रा. एस. बी. पाटील. एनसीसी प्रमुख लेफ्टनंट प्रा. एस. एम. महाजन, डॉ. के. एच. पाटील, प्रा. डी. जे. जाधव प्रा. व्ही. एन. गोरे, प्रा. एस. आर. सावंत उपस्थित होते.

# साप्ताहिक राशी - भविष्य

**दिनांक :०५/०३/२०२४ ते १२/०३/२०२४ अखेर**

**मेष** :तुमच्या राशीचा स्वामी ग्रह मंगळ महाराज वर्षाच्या सुरवाती मध्ये धनु राशीमध्ये तुमच्या नवम भावात सूर्य महाराज सोबत स्थित असेल यामुळे लांब यात्रेचे योग बनतील. तुमच्या सन्मानात वाढ होईल.

**वृषभ** :विद्यार्थ्यांच्या शिक्षणात समस्या येऊ शकतात परंतु, काही विशेष विषयांमध्ये तुमची पकड मजबूत बनेल. वित्तीय दृष्ट्या तुम्हाला लाभ मिळत राहील आणि आर्थिक स्थिती मजबूत होईल.

**मिथुन** : कार्य क्षेत्रात शॉर्टकट घेऊ नका. नोकरी मध्ये स्थानांतरणाची शक्यता आहे. मार्च पासून ऑक्टोबर च्या मध्ये तुम्हाला नोकरी मध्ये बदलाची संधी मिळू शकते. विद्यार्थ्यांना सुरवाती मध्ये काही समस्यांचा सामना करावा लागेल.

**कर्क** : स्पर्धा परीक्षेत यश मिळू शकते. कौटुंबिक जीवन वर्षाच्या सुरवाती मध्ये अनुकूल राहील. देव गुरु बृहस्पतीच्या कृपेने कुटुंबातील मोठ्यांचे सहयोग तुम्हाला मिळत राहील. भाऊ–बहीण मदतगार राहतील परंतु, वडील आणि भाऊ बहिणींना काही समस्या होऊ शकतात.

**सिंह** : लांब यात्रा करण्याची या वर्षी तुम्हाला संधी मिळेल. विदेशात जाण्याची ही संधी मिळू शकते. बृहस्पती महाराज वर्षाच्या सुरवाती मध्ये नवम भावात राहून तुम्हाला योग्य निर्णय घेण्यात मदत करतील.

**कन्या** : भावनांना नियंत्रणात ठेवणे तुमच्यासाठी खूप आवश्यक असेल आणि प्रियतम ला काही ही सांगणे तुमचे नाते बिघडू शकते. सूर्य आणि मंगळ सारख्या ग्रहांचा प्रभाव चतुर्थ भावात वर्षाच्या सुरवातीमध्ये राहील

**तुळ** : वैवाहिक जीवन सुखद होईल. व्यापार करणाऱ्या जातकांसाठी वर्षाची सुरवात अनुकूल राहील परंतु, वर्षाच्या मध्यात काही कमजोर राहण्याची शक्यता आहे. वर्षाच्या पूर्वार्धात आर्थिक दृष्ट्या अधिक अनुकूल राहील.

**वृश्चिक** :व्यवसायिक दृष्ट्या भागीदारी व्यवसायासाठी येणारे प्रस्ताव चांगले असतील. नोकरदार वर्गाला कामामध्ये सुवर्णसंधी मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी राहाल. राजकीय क्षेत्रात काम करण्याची इच्छा पूर्ण होईल.

**धनु** : व्यापार करणाऱ्या जातकांसाठी वर्षाची सुरवात अनुकूल राहील. व्यापारात उन्नती होईल. सरकारी क्षेत्रात लाभ मिळेल. वर्षाच्या मध्यात उत्तम यश मिळू शकते.

**मकर** : तुम्ही आव्हानांना घाबरणार नाही आणि त्यांचा हिंम्मतीने सामना कराल. प्रेम संबंधात प्रगाढता येईल.

**कुंभ** :शनी महाराज तुमच्या कडून मेहनत करवून घेईल जे तुम्हाला नोकरी आणि व्यापार दोन्ही क्षेत्रात उत्तम यश प्रदान करेल. विद्यार्थ्यांना जागृकतेत कमी चा सामना करावा लागेल आणि या वर्षाची सुरवात काहीशी कमजोर राहील.

**मीन:** कौटुंबिक जीवनात काही आव्हाने राहणार आहे म्हणून, तुम्ही सावधान रहा. आरोग्याला घेऊन तुम्हाला चढ–उतारांचा सामना करावा लागू शकतो. डोळ्याच्या संबंधित समस्या

निर्भीड व नि:पक्ष विचारांचा वारसा जपणारे वृत्तपत्र....
॥ शिवसमर्थ ॥

॥ शिवसमर्थ ॥ गोशाळा केंद्र
स्थळ वायचळवाडी-माटेकरवाडी, कुंभारगांव, ता. पाटण

# कलेक्टर जितेंद्र डुडी यांची शेतीमित्र डॉ. संदीप डाकवे यांच्या पाठीवर कौतुकाची थाप

तळमावले/वार्ताहर

सातारा जिल्हयाचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी डॉ.संदीप डाकवे यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारत गौरव केला. डॉ.डाकवे यांना शेतीमित्र पुरस्कार जाहीर दझाल्याबद्दल किसान उत्सव दिनाचे औचित्य साधत शाल, श्रीफळ, आंब्याचे रोपटे आणि कोल्हापूरी फेटा देवून सन्मान केला. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासमवेत यावेळी सातारा जिल्हा कृषी अधिक्षक भाग्यश्री फरांदे व अन्य कृषी कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालयात सातारा जिल्हा कृषी विभागाच्या वतीने या कौतुक सोहळयाचे आयोजन केले होते.पाटण तालुक्यातील डाकेवाडी (काळगांव) येथील पत्रकार डॉ.संदीप डाकवे यांना महाराष्ट्र राज्य शासनाचा कृषी विभागाचा पत्रकारितेचा सर्वोच्च वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यानिमित्त जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांनी हा गौरव केला.

दरम्यान, डॉ.संदीप डाकवे यांनी स्वत: रेखाटलेले कलेक्टर जितेंद्र डुडी यांचे चित्र त्यांना भेट



दिले. या 'सरप्राईज' भेटीमुळे कलेक्टर साहेब खुष झाले. त्यांनी डॉ.संदीप यांच्या पत्रकारितेबरोबर कला कौशल्याचेही कौतुक करत भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ.डाकवे यांच्यासमवेत सौ.रेश्मा डाकवे, कु.सांची डाकवे तसेच विविध कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी, कृषी कर्मचारी उपस्थित होते.लवकरच शेतीमित्र पुरस्काराचे वितरण शासनाच्या वतीने मुख्यमंत्री, राज्यपाल, कृषीमंत्री आणि अन्य मान्यवर यांच्या उपस्थितीत समारंभपूर्वक केले जाणार आहे.

# सचिच्छा भेट



श्रीक्षेत्र कर्जत येथील गोदडनाथ महाराज मंदीरास भेटी प्रसंगी ॲड.जनार्दन बोत्रे साहेब



प्रा.सौ व श्री भोसले सर यांचा सत्कार करताना ॲड.जनार्दन बोत्रे साहेब

# शिवसमर्थ परिवाराची प्रामाणिकपणाची संस्कृती

## जनमाणसात अजुनही प्रामाणिकपणा शिल्लक असल्याचे एक उत्तम उदाहरण

पाटण तालुक्यातील गुढे मान्याचीवाडी येथील रहिवाशी असलेले व दि. शिवसमर्थ मल्टीस्टेट को.ऑप. क्रेडीट सोसा.लि; तळमावले या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री.जनार्दन लक्ष्मण बोत्रे साहेब यांच्या अधिछााखाली कार्यरत असणारा शिवसमर्थ परिवारातील सदस्यांच्या प्रामाणिक पणाचे एक उत्तम उदाहरण.

आज सकाळी मी नेहमी वैयक्तिक कामासाठी सणबूर वरून कराडला एस.टी.बसने गेलो होतो. कराड मधून काम झाल्यावर गावी सणबूर ला परत जाण्यासाठी बसमध्ये बसलो होतो. तद्नंतर मी घरी पोहोचलो. सायं.६:३० वा. तेव्हा मला माझ्या मुलीचा फोन आला. दादा तुमचा फोन एस.टी.मध्ये विसरला होता तो शिवसमर्थ तळमावले संस्थेत ती मुलगी काम करते आहे त्यांना सापडला आहे. उदया सकाळी १० वाजता तळमावले ऑफिसमध्ये येवून घेवून जावा. असे सांगितले आहे. हे शब्द ऐकल्यावर मला जाणीव झाली की, वयाच्या साठीच्या प्रवेशा बरोबरच माझा साथीदार बनलेल्या विस्मरणाचा परिणाम असावा. पण खऱ्या अर्थाने शिवसमर्थ संस्थचे कर्मचारी कु.धनश्री माने आणि सोनाली माने यांचे मनापासून आभार मानतो. त्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी तसेच कौतुक म्हणून त्यांना काही रक्कम बक्षिसादाखल देवू केली पण तीही त्या दोघींनी नाकारली अन् म्हणाल्या काका प्रामाणिकपणा अन् कर्तव्य नावाचीही काही चीज असते. अन् तसी शिकवण आम्हाला दि शिवसमर्थ संस्थेमार्फत मिळली आहे. असे बोलून त्यांनीच चहा देवू केला अन् मी संस्थेतून त्यांचे पुन्हा एकदा आभार मानले आणि परतीच्या प्रवासाला निघालो.

● श्री भगवंतराव पिलोबा खेडेकर (गुरूजी) (संचालक,वि.का.स.सेवा.सोसा सणबूर)

सामर्थ्य आहे चळवळीचे, जे जो करील तयाचे
परंतु तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहीजे ।।
॥ शिवसमर्थ ॥ ॲग्रो
मु.पो.वायचळवाडी-माटेकरवाडी (कुंभारगाव) ता.पाटण,जि.सातारा
मुरघास मशीन स्वस्त दरात भाडे तत्वावर
दुग्ध व्यवसायिक, पशुपालक शेतकरी बंधू यांना
आपल्या खर्चात बचत करण्यासाठी सुवर्ण संधी...!
ओल्या चाऱ्याचे मुरघास बनवून वापरल्यास खर्चात
बचत होईल व दुधात वाढ होवून आपले उत्पन्न वाढेल.



संपर्क 88 05 00 0393 | 85 54 86 7661

# वाढदिवस अभिष्टचिंतन...!

## ॥ शिवसमर्थ ॥ परिवाराकडून वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...



मुख्यकार्याल तळमावले येथील कर्मचारी हणमंत मोळावडे यांचा वाढदिवस साजरा करताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. जनार्दन बोत्रे साहेब ,श्री. संदीप डाकवे, व्यवस्थापक नितीन पाटील,शिवाजी कुठरेकर महाराज व कर्मचारी वर्ग



मुख्यकार्याल तळमावले येथील कर्मचारी अमोल बजबळकर यांचा वाढदिवस साजरा करताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. जनार्दन बोत्रे साहेब ,श्री. संदीप डाकवे, व्यवस्थापक नितीन पाटील,अधिकारी श्री.रविंद्र पाटील शिवाजी कुठरेकर महाराज व कर्मचारी वर्ग



कोकरूड शाखेतील कर्मचारी संदीप तांबे यांचा वाढदिवस साजरा करताना कोकरूड शाखेतील कर्मचारी वर्ग